REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 7 | APRIL - 2025

# "पालघर जिल्ह्यातील कुपोषणग्रस्त बालकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन"

**Ananta Prabhu Pawar**
Research Student KTHM college Research Center
(Affiliated by Savitribai Phule Pune University, Pune)

**Dr. Ambadas Sampat Kapadi**
Research Guide KTHM college Research Center
(Affiliated by Savitribai Phule Pune University, Pune)

**गोषवारा-**



कुपोषण हे देशाच्या विकासातील एक अडथळा बनत असून कुपोषणामुळे भविष्यातील कार्यकारी वर्गाला काळाच्या आड नेले जात आहे. जगातील सर्वात वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था मानल्या जाणाऱ्या भारतात कुपोषणाचे बळी पडणाऱ्या मुलांची संख्या अधिक आहे. कुपोषण म्हणजे आजार नव्हे परंतु अयोग्य आहार उपासमार व जीवनसत्त्वांचा अभाव यांचा परिणाम मुलांच्या शरीरावरती होतो अशी मुले लहानशा आजाराने सुद्धा अशक्त दिसू लागतात. बालकांच्या आहारातील कार्बोदके, प्रथिने, जीवनसत्वे, खनिजे यांच्या कमतरतेमुळे होणारा आजार हा आहे. जागतिक आरोग्य संस्थेने केलेल्या व्याख्येनुसार, कुपोषण म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या पोषण आहारातील कमतरता, अतिरेक किंवा असंतुलन होय. अयोग्य आहार उपासमार व जीवनसत्वांचा अभाव यांचा परिणाम मुलांच्या शरीरावर होतो असे मूल लहानशा आजाराने सुद्धा अशक्त दिसू लागते दैनंदिन आहारातील काही पोषक घटकांच्या कमतरतेमुळे होणाऱ्या आजाराला कुपोषण असे म्हणतात.

**प्रस्तावना-**

भारत हा विकसनशील देश आहे. भारतात आर्थिक व सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणात आहे. आज कोणत्याही देशात लहान मुलांच्या विकासाला सर्वाधिक प्राधान्य दिले जाते. याचे कारण म्हणजे कोणत्याही राष्ट्राचा विकास हा त्या देशातील लहान मुलांच्या विकासावर अवलंबून असतो. भारताला जागतिक महासत्ता बनवण्यासाठी देशाच्या संपूर्ण क्षमतेचा वापर करावा लागेल. त्यासाठी कुपोषणाचे पूर्णपणे निर्मूलन होण्यावर लक्ष केंद्रित करावे लागेल. भारतात १९५४ मध्ये आरोग्य सेवा योजना सुरू झाल्या त्यामुळे आरोग्य व औषधोपचार या सेवा खाजगी क्षेत्रासोबत सार्वजनिक क्षेत्राकडे आलेल्या प्रत्येक भारतीय नागरिकास निरोगी आयुष्य जगण्याचा अधिकार आहे. भारतात कुपोषण ही गंभीर समस्या बनली आहे. ग्लोबल हंगर इंडेक्स २०२२ च्या अहवालामध्ये भुकेची समस्या असणाऱ्या देशांमध्ये ११९ देशांची यादीत भारत १०३ या स्थानावर आहे. जगातील एकूण कुपोषित बालकांपैकी ५० टक्के बालके भारतात आढळतात. कुपोषणाची समस्या भारतातल्या प्रमुख राज्यात दुर्गम डोंगराळ घनदाट अरण्य असणाऱ्या प्रदेशात प्रामुख्याने आदिवासी जमातीत तीव्रतेने आढळतात. भारताला जागतिक महासत्ता बनवण्यासाठी देशाच्या संपूर्ण क्षमतेचा वापर करावा लागेल त्यासाठी कुपोषणाचे निर्मूलन होण्यावर लक्ष केंद्रित करावे लागेल.

**व्याख्या-**

१) "पुरेसा व योग्य आहार न घेतल्यामुळे जी अशक्तपणाची व आजारपणाची परिस्थिती निर्माण होते तिला कुपोषण म्हणतात"

२) "योग्य प्रमाणात अन्नपोषक द्रव्ये असलेल्या सकस अन्नाच्या अभावामुळे शरीरास आलेली रोगट स्थिती म्हणजे कुपोषण होय."

पालघर जिल्ह्यात एकूण ८ तालुके आहेत. या ८ तालुक्यात २०२१ मध्ये कुपोषित बालकांची संख्या ६९०० एवढी आहे. व २०२२-२३ या वर्षात पालघर जिल्ह्यात कुपोषित बालकांची संख्या १७७६६९ एवढी आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे-

१) पालघर जिल्ह्यातील कुपोषणग्रस्त बालकांचा शोध घेणे.

२) पालघर जिल्ह्यातील कुपोषणग्रस्त बालकांच्या कौटुंबिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

३) पालघर जिल्ह्यातील आर्थिक व सामाजिक घटकांचा कुपोषणग्रस्त बालकांच्या कौटुंबिक परिस्थितीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

४) उपोषणग्रस्त बालकांचा विकासाच्या दृष्टीने कुपोषणाचे परिणाम कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुचवणे.

## संशोधनाची गृहीतके-

१) पालघर जिल्ह्यामध्ये कुपोषित बालकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.

२) पालघर जिल्ह्यातील कुपोषणग्रस्त बालकांच्या वाढत्या प्रमाणास तेथील आर्थिक व सामाजिक परिस्थिती कारणीभूत आहे.

३) पालघर जिल्ह्यातील शासकीय योजनांमुळे उपस्थित बालकांच्या संख्येत घट होत आहे.

## संशोधन पद्धती-

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. पालघर जिल्ह्यात एकूण ८ तालुके आहेत. या ८ तालुक्यात २०२१ मध्ये कुपोषित बालकांची संख्या ६९०० एवढी आहे. प्रस्तुत संशोधनासाठी पालघर जिल्ह्यातील एकूण ८ तालुक्यातील ६९०० संख्येपैकी १० टक्के याप्रमाणे ६९० कुपोषित बालकांची अभ्यासाठी निवड करण्यात आलेली आहे.

## कुपोषणाची कारणे-

१) अंगावरील दूध पाजणे लवकर बंद करणे.

२) बाळाला भरपूर व वेळेवर अंगावरील दूध न मिळणे.

३) पोषक आहारास उशिरा सुरुवात करणे.

४) आहारास अ जीवनसत्वाचा अभाव असणे दोन मुलांमध्ये कमी अंतर असणे.

## कुपोषणाचे दुष्परिणाम-

१) वजन न वाढणे व वाढ न होणे.

२) चालणे बोलणे व विचारशक्ती या क्रिया मंदावणे.

३) हातापायाच्या काड्या व पोटाचा गरारा होणे.

४) कुपोषित मुलांना गोवरचा जास्त धोका असतो.

५) टीबी व क्षयाचा विकार वाढतो.

६) प्रतिकारशक्ती कमी होते.

७) चेहऱ्यावर उदारपणा व निरुत्साही वृत्ती.

अनेक माता आपले मूल आजारी पडले असताना किंवा त्याला जुलाब होत असताना सकस आहार देण्याचे थांबवतात. परिणामी मुलांचा अशक्तपणा अधिकाधिक वाढवून मृत्युमुखी पडायचा धोका निर्माण होतो.

**पालघर जिल्ह्यातील कुपोषित बालकांची संख्या २०२२-२३**

| अ.क्र. | तालुके | कुपोषित बालकांची संख्या |
|---|---|---|
| १ | तलासरी | १५९२६ |
| २ | डहाणू | ३३७४४ |
| ३ | विक्रमगड | १३४८५ |
| ४ | जव्हार | १२९८८ |
| ५ | मोखाडा | ८२२७ |
| ६ | वाडा | १४८९५ |
| ७ | पालघर | ३४३५१ |
| ८ | वसई | ४४०५३ |
| | एकूण | १७७६६९ |

**संदर्भ- पालघर जिल्हा आर्थिक व सामाजिक पाहणी २०२२-२३**

पालघर जिल्ह्यात एकूण ८ तालुके आहेत. या आठ तालुक्यात २०२२-२३ या वर्षात कुपोषित बालकांची संख्या १७७६६९ एवढी आहे. पालघर जिल्ह्यात सर्वात जास्त कुपोषित बालकांची संख्या वसई तालुक्यात ४४०५३ एवढे आहे. त्यानंतर पालघर ३४३५१, डहाणू ३३४४४, तलासरी १५९२६, वाडा १४९५ या तालुक्यात आहे. तर सर्वात कमी कुपोषित बालकांची संख्या मोखाडा तालुक्यात ८२२७ एवढी आहे.

## संदर्भ साहित्याचा आढावा-

### १) श्रीवास्तव राकेश (२०१८) -

यांनी 'उपोषणाची समस्या आणि तंत्रज्ञानाचा वापर' या विषयावर योजना मासिकात लेख प्रकाशित केलेला आहे. भारताला जागतिक महासत्ता बनवण्यासाठी कुपोषणाचे पूर्णपणे निर्मूलन करावे लागेल. कुपोषणाच्या निर्मूलनावर पूर्णपणे लक्ष केंद्रित केल्यास भावी पिढी आरोग्य संपन्न तसेच उच्च क्षमतेची बुद्धिमत्ता असलेली आणि कामाची उत्पादकता वाढवणाऱ्या असतील. कुपोषण नष्ट करण्यासाठी सर्वांना एकत्र आणून आपल्या जबाबदाऱ्या आणि उत्तरादायित्व एकत्रितपणे पार पाडता यावे. यासाठी पोषण आवश्यक आहे.

### २) फेंडरकर अर्चना (२०२२)-

यांनी 'कुपोषण आणि शासकीय आरोग्य सुविधा' या विषयावर संशोधन लेख सादर केला आहे. देशाची लोकसंख्या ही त्या देशाची खरी साधन संपत्ती असते. देशाचा विकास हा त्या देशातील लोकसंख्या आणि उपलब्ध नैसर्गिक साधनसामग्री वर अवलंबून असतो. कुपोषण म्हणजे आजार नव्हे परंतु योग्य आहार, उपासमार व जीवनसत्वांचा अभाव यांचा परिणाम मुलांच्या शरीरावर होतो. अंगावर सूज येणे, मूल रडकी होणे, बाळाची वाढ खुंटणे म्हणजे कुपोषण होय.

### ३) पवार संतोष (२०२२)-

यांनी कुपोषणामुळे आदिवासींच्या सर्वांगीण विकासावर होणाऱ्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास केलेला आहे. त्यांनी नंदुरबार जिल्ह्यातील कुपोषित बालकांचा अभ्यास केलेला आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, कुपोषणाचा परिणाम हा बालकांच्या शारीरिक व मानसिक वाढीवर होतो त्यामुळे बालकांची शारीरिक वाढ खुंटते व बौद्धिक विकास होत नाही. कुपोषणाचा परिणाम हा बालकांच्या सर्वांगीण विकासावर होत असतो.

## कुपोषणा वरील उपाय-

१) बाळाला एक ते दीड वर्ष स्तनपान करणे.

२) बाळाला पहिल्या दिवसापासून वेळेवर दूध पाजणे.

३) सहा महिन्यानंतर लगेचच स्तनपानाबरोबर वरच्या आहाराला सुरुवात करावी.
४) दोन मुलांमधील अंतर कमीत कमी तीन वर्ष असावी.
५) मुलांचे सर्व लसीकरण वेळेत करावे.
६) अंगणवाडीचा पोषक आहार मुलांना वेळेवर व नियमित द्यावा.

## सारांश-

कुपोषण हे आहारातील कार्बोदके, जीवनसत्वे, प्रथिने, खनिजे यांच्या कमतरतेमुळे होणारा आजार आहे. कुपोषणामुळे बालकांच्या आजारपणात वाढ होते. अंगावरच्या दुधाशिवाय इतर कोणतेही अन्न नसणारी मुले कित्येक वेळा दिसायला गुटगुटीत दिसली तरी सुद्धा ती कुपोषणाच्या सीमारेषेवर असतात. अयोग्य आहार व जीवनसत्वांचा अभाव यांचा परिणाम शरीरावरती होतो. असे मूल लहानशा आजाराने सुद्धा अशक्त दिसू लागते. थोडक्यात पुरेसा व योग्य आहार न घेतल्यामुळे जी अशक्तपणाची आजारपणाची परिस्थिती निर्माण होते त्याला कुपोषण असे म्हणतात.

## संदर्भ-

१) वेबसाईट- https://mr.vikipedia.in
२) वेबसाईट- https://mr.vikipedia.in
३) वेबसाईट- https://mr.vikipedia.in
४) पालघर जिल्हा आर्थिक व सामाजिक पाहणी २०२२-२३, पृ. क्र. २०८
५) राकेश श्रीवास्तव, कुपोषणाची समस्या आणि तंत्रज्ञानाचा वापर, योजना मासिक, मे. २०१८, पृ. क्र. २७.